
बुधवार, 26 ऑक्टोबर 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक -80
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी



● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 26 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-80 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

## सूर्यग्रहण....



मंगळवारी औरंगाबादेतील एन -४, सिडको येथून दिसलेले सूर्यग्रहण....
छायाचित्र : स्वप्निल कोर्टीकर

# दिवाळीनंतर मंत्रिमंडळ विस्ताराचे फटाके

## भाजपकडून नितेश राणे आणि गोपीचंद पडळकरांची वर्णी?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई: गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार आता लवकरच होणार आहे अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. गेल्या वेळी सर्व कॅबिनेट मंत्र्यांचा शपथविधी पार पडला होता, येत्या विस्तारात राज्यमंत्र्यांनाही स्थान दिलं जाणार असल्याचे संकेतही त्यांनी दिले. भाजपकडून या मंत्रिमंडळाच्या विस्तारात नितेश राणे, गोपीचंद पडळकर, गणेश नाईक यांना संधी मिळण्याची शक्यता आहे.**

गेल्या वेळच्या मंत्रिमंडळात शिंदे गटातील नऊ जण आणि भाजपच्या नऊ जणांनी मंत्रिपदाची शपथ घेतली होती. त्यानंतर मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाठ आणि आमदार बच्चू कडू यांनी नाराजी व्यक्त केली होती. सोबतच शिंदे गटाचे अनेक आमदार नाराज असल्याची चर्चा होती. भाजपमध्येही प्रमुख नेत्यांना स्थान न मिळाल्याने ते नाराज असल्याची चर्चा होती.

### मंत्रिमंडळात विस्तारात यांना मिळू शकते संधी?

प्रवीण दरेकर, संजय कुटे, विजयकुमार देशमुख किंवा सुभाष देशमुख, गणेश नाईक, संभाजी पाटील निलंगेकर, प्रसाद लाड, योगेश सागर, देवयानी फरांदे, माधुरी मिसाळ, जयकुमार गोरे, प्रशांत ठाकूर, मदन येरावार, महेश लांडगे किंवा राहुल कुल, निलय नाईक, गोपीचंद पडळकर, नितेश राणे



## प्रदूषणावरून भाजपाची केजरीवालांवर टीका

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भाजपाने दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पार्टीचे संजयोजक अरिवंद केजरीवाल यांच्यावर दिल्लीतील वायू प्रदुषणाच्या मुद्द्यावरून टीका केली आहे. याशिवाय केवळ दिल्लीच नाहीतर संपूर्ण उत्तर भारतामधील हवेच्या खराब गुणवत्तेसाठी जबाबदारही ठरवले आहे. राजधानी आणि इतर शहरांमधील प्रदूषणासाठी आम आदमी पार्टीचे सरकार असलेल्या पंजबामध्ये शेतांमध्ये लावलेल्या आगीला जबाबदार ठरवले आहे. राजधानीचा हवा गुणवत्ता निर्देशांक मंगळवारी सकाळी ८ वाजता ३२६ वर होता. गाझियाबाद (२८५), नोएडा (३२०), ग्रेटर नोएडा (२९४), गुरुग्राम (३१५) आणि फरिदाबाद (३१०) या शहरांमध्ये खराब ते अतिशय खराब हवेच्या गुणवत्तेची नोंद झाली आहे. भाजपा नेते अमित मालवीय यांनी ट्वीटद्वारे म्हटले आहे की, पंजाबमधील शेतांमध्ये लागलेल्या १ हजार १९ आगीच्या घटना केवळ दिल्लीच नाहीतर संपूर्ण उत्तर भारतामधील हवेची गुणवत्ता खराब होण्यामागचे कारण होते.




## तब्बल दोन तास व्हॉट्सॲप बंद


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** जगभरात कोट्यवधी युजर्स असणारं व्हॉट्सॲप भारतीय प्रमाणवेळेनुसार मंगळवारी दुपारी १२च्या सुमारास डाऊन झाले. त्यामुळे जगभरातील युजर्स ट्विटरवर येऊन यासंदर्भात ट्वीट्स करू लागले आहेत. एकीकडे काही तांत्रिक बिघाडामुळे व्हॉट्सॲप डाऊन झाल्याचं सांगितलं जात असतानाच दुसरीकडे हा सायबर हल्ला असण्याचीही शक्यता वर्तवली जात आहे. सुरुवातीला काही काळ व्हॉट्सॲप ग्रुपवर मेसेजेस पाठवता येत नव्हते. मात्र, काही वेळानंतर पर्सनल चॅटदेखील बंद झाले. पहिल्या अर्ध्या तासातच हजारो युजर्सनी ही समस्या येत असल्याचं ट्विटरवर सांगितलं. मात्र, अखेर जवळपास दोन तासांच्या विस्कळीत सेवेनंतर, व्हॉट्सॲप पुन्हा पूर्ववत सुरू झालं आहे.

सर्व्हरमध्ये बिघाड?

दरम्यान, व्हॉट्सॲपच्या सर्व्हरमध्ये बिघाड झाल्याची प्राथमिक माहिती आधी समोर आली होती. यासंदर्भात काही कालावधीनंतर व्हॉट्सॲपकडून अधिकृतरीत्या प्रतिक्रिया देताना 'लवकरात लवकर बिघाड दुरुस्त करण्यासाठी प्रयत्न करत आहोत', अशी माहिती देण्यात आली. मात्र, अचानक व्हॉट्सॲप बंद पडल्यामुळे लाखो नेटिझन्सनी ट्विटरकडे धाव घेत आपला संताप तिकडे व्यक्त केला. आम्हाला माहिती आहे की सध्या काही युजर्सला व्हॉट्सॲप वापरण्यात अडचणी येत आहेत. आम्ही त्यावर काम करत असून लवकरात लवकर सगळ्यांसाठी सेवा पुन्हा सुरळीत करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत", अशी प्रतिक्रिया व्हॉट्सॲपच्या प्रवक्त्यांनी दिली होती.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# सर जो तेरा चकराये ...

आधुनिक केसरी

आमच्याकडे जो पुंडलिक म्हणून न्हावी यायचा त्याचा आहार उत्तम होता. एक डझन केळी तो सहज पाच दहा मिनिटात फस्त करायचा. कधी कधी जेवायला यायचा तेव्हा चार पाच भाकरी किंवा आठ दहा पोळ्या त्याला लागायच्या. गावात कोणाकडे छोटे मोठे कार्य वा नवस वगैरे असला की हमखास न्हाव्याला बोलावले जायचे. त्याच्याकडे एक वाद्य होते. त्याला भेर म्हणायचे. भेर नावाचे वाद्य पूर्वी युद्धाच्या वेळी सैनिकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या अंगात वीरश्री संचारण्यासाठी वाजवले जायचे. पुढे ते आनंदाच्या प्रसंगीही वाजवले जाऊ लागले. गावात भेर वाजत असेल तर कोणाकडे काय कार्यक्रम आहे हे गावातील लोकांना कळायचे. भेर म्हणजे एक लांब पितळेचे तुतारी सारखे वाद्य असून न्हावी किंवा ते वाजवणारा आपल्या तोंडाने जोरात हवा फुंकून हे वाद्य वाजवायचा. या वाद्याचा पुढचा भाग रुंद आणि मोठा असल्याने गावकरी नवरदेव किंवा नवरी किंवा लहान मुलांच्या अंगावरून ओवाळून सुटी नाणी या भेरीच्या पुढील भागात फेकायचे. त्यावेळी अगदी पाच,दहा, वीस, पंचवीस, पन्नास आदी पैशांची सुटी नाणी असायची. नाण्यांनी ती भेर जड झाली की न्हावी ती काढून घ्यायचा. मंगल कार्याच्या प्रसंगी नवरदेव किंवा नवरीला कोणी काय आहेर दिला ते सुद्धा घोषणा करून सांगायचे काम या मंडळींकडे असायचे. आपल्या खास ग्रामीण ढंगात मग ही मंडळी त्याची घोषणा करायची. पण आता काळानुसार या मंडळींनी स्वतःला बदलले आहे. आताचा नाभिक म्हणजे फक्त पूर्वीचा कैची, वस्तरा घेऊन हजामत करणारा राहिला नाही. अनेक प्रकारची आधुनिक साधने त्यांनी आपल्या व्यवसायात वापरायला सुरुवात केली आहे. **(क्रमशः)**





## आनंदी पहाट

# घराच्या घरपणासाठी आनंदी वातावरणाची गरज

आधुनिक केसरी

आजवर मनावर अनेकप्रकारे अनेकांनी भाष्य केले आहे. संतांनी देखील जगाला एकच गोष्ट सांगितली, ती म्हणजे मनाचे स्वास्थ्य टिकवा. ह्याचा अर्थ शरीराकडे दुर्लक्ष करा, असे अजिबात नाही. परंतू मन दिसत नसल्यामुळे त्याचा विचार आपल्याकडून कमी होत असतो. शरीर मात्र दिसत असते, त्यामुळेच ते सदैव सुंदर ठेवले जात असते. शरीराचीच काळजी अधिक घेतली जाते. शरीराला पौष्टिक खाद्य देण्यातही आपण कधी मागे हटत नाही, खर्चाचा तर अजिबातच विचार करत नाही. शारीरिक तंदुरुस्तीसाठी खरे म्हणजे मानसिक स्वास्थ्यच अधिक महत्वाचे आणि मोलाचे असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात. ज्यामुळे आपली मानसिकता बदलत राहते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने एकूणच जरा हटके विचार करण्याची जरुरी असते. नंतरच कार्यकृती करणे योग्य ठरत असते. अर्थात सरधोपटपणे केलेल्या कार्यकृतीत इतका विचार केलेला नसतो, हेही तितकेच खरे. आपल्या अंतर्मनांत जीवनासाठी अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. ह्यात सकारात्मक आणि विवेकी विचारांना अधिक महत्व असते. त्यासाठी आपल्या जिव्हाळ्याचे, हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. ते घर कितीही छोटे असले तरीही फरक पडत नाही, पण आपले मन मात्र मोठेच असायला लागते. अर्थात, घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. आपल्या जीवनाच्या समृद्धीसाठी आयुष्याची सुरुवातच घरामध्ये सकारात्मक विचारांनी करायची असते.



आधुनिक केसरी

## भवसिंधु पार | कर्म करी ||

देहाचे चोचले | यातना कारक ||
देहाला घातक | ठरताती ||१||

इंद्रियांच्या गळा | वासनेचा फास ||
नेतो नरकास | ओढोनिया ||२||

विवेकाच्या अंगी | नांदते विरक्ती ||
देहाची आसक्ती | क्षीण होय ||३||

आप-पर भाव | लुप्त ज्याचा झाला ||
त्याच्या इंद्रियाला | बाधा कैसी ||४||

निस्संग मनाचा | सत्संग आचार ||
भवसिंधु पार | कर्म करी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी

## विनवणी

जुळवोनी दोन्ही कर तव चरणी आलो अंबाबाई
भवारण्य तारोनी तव चरणी शरण तू देई।।
माये तुजवाचोन जगती माझे कोणी नाही
दीनपतित पामर विनवितो मी तुज आई।।
संसारानलाने मी तप्तसंतप्तत्रस्त होई
दीप्तसंदीप्त तू आई मज जवळी घेई।।
चरणापासोनी दूर जाता दूर सुख जाई
येता तव चरणाशी दूर दूर दुःख जाई।।
सर्वसुखाची घागरू विलसते तुझिये पायी
चंद्रहास मागतो करूणेचे दान तू देई।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# अध्यात्म

आधुनिक केसरी

अध्यात्म- 'अधि आत्म'- म्हणजे स्वतकडे पाहणे. अर्थातच स्वतकडे पाहण्यात आत्मपरीक्षण येते. त्यातूनच आपल्या जीवनाचा खोलवर दडलेला अर्थ काय, याचा विचार सुरू होतो आणि मग एक 'पूर्णत्वा'ची आस निर्माण होते. आपल्या दैनंदिन आयुष्यापेक्षा, त्यातल्या अनेक ऐहिक गोष्टींपेक्षा मोठे काहीतरी, परिपूर्ण असलेले, खोलवर अर्थ प्राप्त करून देणारे आयुष्यात काही आहे याची जाणीव निर्माण होते. आपल्या अवतीभोवतीच्या जगात काय अर्थ दडला आहे, त्याचा वेध घेऊन त्यात आपले म्हणजे मानवाचे स्थान काय, कार्य काय, हे शोधून काढण्याची एक आंतरिक इच्छा प्रत्येक मानवात असते. ही प्रक्रिया म्हणजे आध्यात्मिकता. अध्यात्म आणि धर्म या गोष्टी समान नाहीत. अध्यात्म आणि धर्म हे दोन्ही संस्कृतीचाच भाग आहेत. मानवापेक्षा श्रेष्ठ असा देव, अशी शक्ती किंवा असे 'कोणीतरी', असते हे आध्यात्मिक माणूस मानतो अथवा नाही मानत. आस्तिक आणि नास्तिक दोघेही आध्यात्मिक असू शकतात. धर्म माणसाला जगण्याचा मार्ग दाखवतो. पण खूप वेळा धार्मिकता ही रूढी-परंपरा, परमेश्वरस्तुती, पूजा-अर्चा, प्रार्थना यातून व्यक्त होते. याउलट आध्यात्मिकतेला कर्मकांडाचे बंधन नाही. असे असले तरी धार्मिकता, धर्मश्रद्धा आणि आध्यात्मिकता हातात हात घालून चालतात. अध्यात्माकडे ओढा असलेले अनेकदा धार्मिकसुद्धा असतात. धार्मिक ग्रंथांचे वाचन, निरूपण करणे, त्यांच्या अर्थाविषयी चर्चा आणि वादविवादांमध्ये सहभाग घेणे, जप, नामस्मरण यातून मन शांत करणे, ध्यानधारणेतून मनशक्ती वाढवणे अशा वेगवेगळ्या पद्धतींनी 'स्व'चा शोध घेतला जातो.

# तुकोबांची गाथा का अभ्यासावी ?

आधुनिक केसरी

अखिल विश्वातील मानव जातीच्या कल्याणाच्या गोष्टी श्रीतुकोबांनी लिहून ठेवल्या आहेत. म्हणून हे साहित्य प्रत्येकाने वाचलेच पाहिजे असा त्यांचा अट्टहास होता. श्रीतुकोबारायांनी भरपूर अभंग लिहिले. आपल्या मानव देहाचे आणि जीवनाचे प्रयोजन सांगताना लिहितात "धरिल्या देहाचे सार्थक करीन । आनंदे भरीन तिन्ही लोक' आता हे करताना आनंदमय सृष्टीच्या निर्माणात ज्या ज्या गोष्टींची बाधा येते त्या त्या गोष्टी बाजूला सारणे हे कर्तव्यच ठरते. म्हणून उच्च गुणांनी युक्त, अहंकारविरहित, अतिशय नीतिमान असा माणूस निर्माण केला की श्रीतुकोबांना अभिप्रेत अशी आनंदमय सृष्टी आपोआप तयार झाली असती. म्हणून त्यांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून जगाला नीतिमत्ता शिकविणे सुरू केले. ते लिहितात-

**आम्हा हेचि कौतुक ।जगा द्यावी नित ।।**
**चुकती फजित ।करावे ते ।।**

विश्वव्यापक अशी रचना : श्रीतुकोबांनी आपल्या अभंगातून कोरड्या ज्ञानींना सडकून काढले आणि भोळ्याभाबड्या अज्ञानी लोकांच्या मनात आत्मविश्वास जागविला. ते लिहितात- एक परी बहीर बरे । परी ती ढोरे ग्यानगंडे. बहीर म्हणजे अडाणी माणूस आणि ग्यानगंडे म्हणजे ज्ञानाचा अहंकार झालेले लोक. अशी माणसे ही ढोर आहेत असे श्रीतुकोबा म्हणतात. ज्ञानाचा अहंकार असलेले लोक कोडीयाचे गोरेपण / तैसे अहंकारी ज्ञान असे वाटत. आपल्या अभंग रचनेचा हेतू श्रीतुकोबांना माहीत होता. ते लिहितात-


**नव्हे शब्द एकदेशी / सांडी गवशी कोणाला //१//**
**झाली माझी वैखरी / विश्वंभरी व्यापक //धृ//**

एकदेशी म्हणजे एकांगी. तुकोबा लिहितात की माझे शब्द हे एकपक्षी किंवा एकांगी नाहीत, कुणाची तरी बाजू मांडणारे आणि कुणावर तरी अन्याय करणारे असे पक्षपाती नाहीत. तर ते विश्वातील समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी लिहिले गेलेले आहेत. म्हणूनच माझी वैखरी ही सर्व विश्वाचं कल्याण करण्याएवढी व्यापक झालेली आहे. अजून एका अभंगात तुकोबा लिहितात की जसे माझे शब्द हे 'एकदेशी' नाहीत तसे माझे कवित्व म्हणजे काही एकामागून एक बाहेर पडणारे टांकसाळी नाणे सुद्धा नाहीत.

**नव्हे हे कवित्व टांकसाळी नाणे ।**
**घेती भले जन भले लोक ।।१ ।।**
**लागलासे झरा पूर्ण नवनीते ।**
**सेविलिया हित फार होय ।।धृ ।।**

माझे कवित्व म्हणजे टांकसाळीतून हवे तेव्हा, हवे तसे आणि हवे तेवढे नाणे काढावे तसले नाही. तोचतोचपणा असलेले नाही तर नित्य नवीन असे नवनीत आहे. या काव्यात लोकांच्या भल्याचा विचार आहे. म्हणून समाजातील जे कोणी भले लोक आहेत ते माझ्या या काव्याचा आशय आणि उपदेश शिरसावंद्य मानतात.

माझे कवित्व म्हणजे जणू काही पूर्णपणे लोण्याचा झरा



आहे. यात तुम्हाला ताकाचा (अर्थात फोलपण) लवलेशही आढळणार नाही. तेव्हा असे हे नवनीतरुपी काव्याचा आशय समजून घेतलात आणि त्या प्रमाणे आचरण केलात तर तुमच्या जीवनाचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही.

**अर्थासहित पाठांतर करा :**

अखिल विश्वातील मानव जातीच्या कल्याणाच्या गोष्टी तुकोबा लिहू शकले कारण त्यांचा आमचा स्वदेश । भुवनत्रयामाजी वास बाणा होता. अवघे त्रिभुवन म्हणजे त्यांचा स्वदेश झाला होता. म्हणून मानव कल्याणाचे हे साहित्य प्रत्येक मनुष्याने वाचलेच पाहिजे असा त्यांचा अट्टाहास होता. ते वाचत असताना प्रत्येक शब्दाचा अर्थ समजून घेण्याची भावनाही तुकोबा बोलून दाखवतात. शब्द हे केवळ घोकण्याचे साधन नाही तर प्रत्येक शब्दागणिक येणारा अर्थ सुद्धा आपण समजून घ्यायला हवा असे तुकोबांना वाटत होते. एका अभंगात लिहितात-

**अर्थेविन पाठांतर कासया करावे ।**
**व्यर्थची मरावे घोकूनिया ।।**
**घोकूनिया काय वेगी अर्थ पाहे ।**
**अर्थरूप राहे होऊनिया ।।**
**तुका म्हणे ज्याला अर्थी आहे भेटी ।**
**नाही तरी गोष्टी बोलो नका ।।**

अर्थाविना पाठांतर करणे म्हणजे नुसते घोकून मरणे होय. घोकण्याऐवजी तुम्ही त्या शब्दांचा मथितार्थ नीट समजून घ्या आणि तो समजल्यानंतर तुम्ही स्वतः अर्थरूप होऊन राहा. म्हणजे एकदा का अर्थ समजला की तुम्ही त्याप्रमाणे प्रत्यक्ष आचरण करा. अन्यथा कोरडे मार्गदर्शन करणे बंद करा.

म्हणून आपण साऱ्यांनी तुकोबांचा अभंगरूपी नवनीत असा झरा नित्य नेमाने सेवन केला पाहिजे. कारण 'लागलासे झरा पूर्ण नवनीते ।सेविलिया हित फार होय' याच्या सेवनाने आपले फार फार कल्याण होते.

# सावळदबारा येथे चक्रधर स्वामी मंदिराजवळ हायमास्ट लाइटचे उद्‌घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दि.२४/१०/२२ दिवाळी व पाडव्याच्या शुभमुहूर्तावर राज्यात प्रसिद्ध असलेले महास्थान भगवान श्री चक्रधर स्वामी मंदिर सावळदबारा आज दिवाळीच्या निमित्त चक्रधर स्वामी मंदिर समोर शिवशाई एंटरप्राइजेसचे मालक चेतन मोरसिंग चव्हाण वाळूज पंढरपूर यांच्यातर्फे रा.नादांतांडा सावळदबारा मंदीरावर लाईट देण्यात आला आहे.अशे दहा ते बारा मिनी हाय मास्ट लाइट त्यांनी नादांतांडा येथे देण्यात येऊन बसविण्यात आलेले आहेत.त्याचा लोक अर्पण सोहळा भाजपाचे इद्रीस मुलतानी यांच्या हस्ते करण्यात आला होता. पुन्हा एक हाय मिनी लाइट सावळदबारा येथील स्मशानभूमीत देणार असल्याची माहिती त्यांनी जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना सांगितले. चक्रधर स्वामी मंदीरावर मिनी हाय मास्ट लाइट दीपदिवा लावून लोक अर्पण सोहळा सरपंच मोरसिंग दगडू चव्हाण नादांतांडा यांच्या हस्ते करण्यात आला. सरपंच मोरसिंग चव्हाण यांच्यास्व खर्चाने हाय मास्ट लाइट लावून दिला आहे.या हाय मास्ट लाईटचा भाविक भक्त व ग्रामस्थांना होणार येथे रात्रीच्या वेळी अंधार असायाचा याचा फायदा मंदीरावर येणाऱ्या यात्रेकरूंना जास्त लाभ होणार असल्याची माहिती भाजपचे जि.उपध्याक्ष औरंगाबाद जयप्रकाश चव्हाण यांनी सांगितले. यावेळी भाजपा जि.उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण,प्राचार्य पंजाबराव कोलते( पाटील ) तसेच सरपंच भाऊराव कोलते, विनोद टिकारे,रामचंद चिमणकर, तालुका उपाध्यक्ष शांताराम खराटे,रा.काँग्रेसचे तालुका अध्यक्ष मो.आरिफ मो.लुखमान, प्रा.दीपक चोपडे सर,अवतार चव्हाण, विष्णू भाऊ चव्हाण,प्रा.सुदाम जाधव, समाधान जाधव, भगवान तारापुरे,केशव आप्पा सवकर, दीपक मानकर, संजू राजपूत, मोहन सुरडकर,गजू भाऊ गट, संतोष राजपूत, मधुकर पुजारी, गोकुळसिंग राजपूत, रहीम भाऊ पठाण, जब्बार तडवी, पत्रकार



व ग्रामस्थ संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी शिवशाई एंटरप्राइजेसचे मालक चेतन मोरसिंग चव्हाण वाळूज औरंगाबाद यांचे मंदिराचे पुजारी मंडळी, मधुकर पुजारी व ग्रामस्थांनी आभार मानले.












# इंझमामचे भाकित

आधुनिक केसरी

पाकिस्तानचा माजी कर्णधार इंझमाम-उल-हकने भारताचा माजी कर्णधार आणि पाकिस्तानविरुद्धचा सामना जिंकवून देण्यात मोलाचा वाटा उचलणाऱ्या विराट कोहलीसंदर्भात महत्त्वाचे विधान केले आहे. विराटने पाकिस्तानी संघाच्या तोंडचा विजयाचा घास हिरावून घेतल्यानंतर इंझमाम-उल-हकने विराटचं कौतुक करतानाच भारतीय संघ व्यवस्थापनाला अप्रत्यक्षपणे टोला लगावला आहे. भारतीय संघ विराटशिवाय काहीच नाही असे मत इंझमाम-उल-हकने व्यक्त केले आहे. पाकिस्तानविरुद्धच्या दमदार कामगिरीनंतर विराटचे कौतुक करताना इंझमाम-उल-हकने भारतीय संघाला आरसा दाखवण्याचंही काम केले आहे. भारतीय संघ हा उत्तम आहे. तो सांघिक कामगिरीच्या जोरावर प्रतिस्पर्धांसाठी धोकादायक ठरु शकतो. मात्र या संघामध्ये केवळ विराट कोहलीच एकमेव खेळाडू आहे जो उत्तम खेळ करतोय, असं स्पष्ट मत इंझमाम-उल-हकने मांडले. सर्वाधिक धावा करणारे आणि सामना जिंकून देणारे असे दोन प्रकारचे फलंदाज असतात असेही इंझमाम-उल-हकने म्हटले आहे. “काही खेळाडूंनी धावा केल्या तरी आपल्या संघाला सामना जिंकवून देण्यात ते अपयशी ठरतात. मात्र असे काही खेळाडू आहेत जे आपल्या संघाला एकहाती सामना जिंकवून देण्याची क्षमता ठेवतात. विशेष म्हणजे तणाव असताना ते सामने जिंकून देतात. विराट हा तशाच प्रकारचा खेळाडू आहे. त्याचा दर्जाच वेगळा आहे,” असे म्हणत पाकिस्तानच्या माजी क्रिकेटपटूने विराटचं कौतुक केलं आहे. विश्वचषक स्पर्धेच्या सुरुवातीलाच कोहलीला लय गवसल्याने भारताला फायदा होणार असल्याचे सूचक विधानही इंझमाम-उल-हकने केले आहे. “भारताची कामगिरी एकाच खेळाडूवर अवलंबून आहे आणि तो खेळाडू आहे विराट कोहली. विराट कोहली चांगल्या फॉर्ममध्ये नव्हता म्हणून भारतीय संघ मागील काही काळापासून वाईट कामगिरी करत होता. त्यामुळेच आता त्या लय गवसल्याने विश्वचषक स्पर्धेमध्ये भारतीय संघाचं पारडं अधिक जड झाले आहे,” असे इंझमाम-उल-हक म्हणाला.

विराट नसेल तर भारत विश्वचषक स्पर्धा जिंकण्याचा विचारही करु शकत नाही, असेही पाकिस्तानच्या माजी कर्णधाराने म्हटलं आहे. “विराटला त्याची लय गवसली हे भारतीय संघाच्या दृष्टीने फारच चांगलं आहे. विशेष म्हणजे ही लय त्याला पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात गवसली. तसे हे कोणत्याही सामन्यात होऊ शकले असते. मात्र हे घडले पाकिस्तानविरुद्द्च्या पहिल्याच सामन्यात. विराट आणि पंड्याने उत्तम पार्टनरशीप केली. पंड्या बाद झाल्यानंतरही कोहलीने धावगती कायम राखली आणि प्रेशर घेतलं नाही हे फार निर्णायक ठरले. तो सेट बॅट्समन होता तरी त्याच्यावर प्रेशऱ होतं. मात्र शेवटच्या दोन षटकांमध्ये त्याने ज्या पद्धतीने फलंदाजी केली त्यावरुन त्याचा दर्जा वेगळा असल्याचे दिसून येते. त्याने रौफला लगावलेले ते दोन षटकार दर्जेदार होते,” असे इंझमाम-उल-हकने सामन्याचे विश्लेषण करताना म्हटलंय. भारतीय संघाची धावसंख्या ३४ वर चार गडी बाद अशी असताना हार्दीक पंड्या आणि विराटने ११३ धावांची पार्टनरशीप केली. पंड्या ३७ चेंडूंमध्ये ४० धावा करुन बाद झाला. मात्र या पार्टनरशीपमध्येही कोहलीने ४१ चेंडूंमध्ये ६९ धावा केल्या. कोहलीने ५३ चेंडूंत सहा चौकार आणि चार षटकारांच्या साहाय्याने नाबाद ८२ धावांची खेळी करताना भारताचा विजय साकारला. भारताने टी-२० विश्वचषकाच्या आपल्या पहिल्याच सामन्यात पाकिस्तानला चार गडी राखून पराभूत केले.

# कृतज्ञता



आहेर वा. र.
संपर्क क्र. : 9958782982

आधुनिक केसरी

**पन्नास वर्षांनी मागे वळून बघितल्यावर ,त्याकाळी कोपरगावच्या सदगुरू गंगागिरी महाराज कॉलेज व्यवस्थापनाने दिलेली आश्वस्त प्रेम, सहकार्य आठवून मनात त्यांच्याविषयी कृतज्ञता निर्माण होते. त्यामूळे मनापासून त्यांचे आभार मानावे तितक थोडेच. मॅट्रीक पास झाल्यावर मार्कशीट मिळाले आणि कॉलेजला प्रवेश घेण्याविषयी, हायस्कूलचे सर आणि गावातील हितचिंतक यांनी सत्कार केल्यावर सदगुरू गंगागिरीमहाराज सायन्स कॉलेजात कोपरगावला प्रवेश घेण्याचे ठरले.**

स्कूल कमिटीचे चेअरमन वसंतराव पाटील आहेर यांच्या गाडीतून निघालो. त्यांच्या ओळखीच्या शेजारच्या सांगवी भूसार गावचे श्री. पंडितराव जाधव यांचे वस्तीवर त्यांना कॉलेज प्रवेश घेण्याविषयी भेटायला पोहचलो. वसंतराव पाटलांनी पंडितराव अण्णांची मला ओळख करून दिली आणि सायन्स कॉलेजात कोपरगावला प्रवेश घेण्याविषयी बोलले. माझे मॅट्रीकचे मार्कशीट अण्णांनी पाहिले आणि खुष झाले. अण्णा म्हणाले,

अरे आम्ही आता कोपरगावलाच चाललो आहोत .सायन्स कॉलेजात कोपरगावला माझा मुलगा राजेन्द्रला आज सायन्सला प्रवेश घ्यायचा आहे. तूही चल आमच्याबरोबर. मग आमची वरात पंडित राव अण्णा आणि राजेंद्र जाधव यांचे बरोबर त्यांच्या गाडीतून कोपरगावला निघाली. पंडित राव जाधव सायन्स कॉलेजचे ट्रस्टी होते.कॉलेजात गेल्यावर आम्हा दोघांना प्राचार्य एस.डी.पाटील यांच्या कडे घेऊन गेले.प्राचार्यानी आम्हाला हेडक्लार्क श्री. बिरंगळसर यांचेकडे प्रवेश घेण्यासाठी पाठविले. राजेंद्र याने कागदपत्र पूर्ण करून पैसे भरून प्रवेश घेतला. नंतर बिरंगळसराना माझ्या हलाखीच्या परिस्थितीची माहिती दिली आणि माझे मार्कशीट दाखवलं. त्यांनी मार्कशीट बघितले आणि म्हणाले, "तू काळजी करू नकोस.तुला चांगले मार्क आहे. तुला स्कॉलरशिप मिळेल त्यामुळे होस्टेलवर रुम मिळेल, भोजन व्यवस्था होईल. हे फॉर्म घेऊन जा.सोमवारी फॉर्म भरून आणि इतर कागद पत्र तसेच फीचे पैसे घेऊन ये.मला भेट . तूझा प्रवेश पक्का समज. सरांनी दिलेला फॉर्म घेतला आणि पंडितराव अण्णांच्या बरोबर परत यायला निघालो.परत येताना अण्णांनी मला सोमवारी फॉर्म भरून प्रवेश घेण्याविषयी आग्रह केला. मुखेडला गेल्यावर हेडसर श्री. आहिरेसरांच्या मदतीने कॉलेजचा प्रवेश अर्ज भरला. सोबत मार्कशीट, उत्पन्नाचा दाखला आणि वर्तणूकीचा



दाखला जोडले.सोमवारी कोपरगावला जाऊन प्रवेश अर्जासह प्रवेश फी आणि होस्टेल फी भरली. बिरंगळसरानी पुढच्या सोमवारी कॉलेज सूरू होईल. तेव्हा प्रदर्शन होस्टेलला राहण्यासाठी आणि माळी बोर्डींगला भोजनासाठी चिठ्ठी घेऊन जायला सांगितले. सोमवारी जगन्नाथ पा.आहेर यांनी मोटारसायकलवर कोपरगावला प्रदर्शन होस्टेलवर मला सोडले.

रूम नं.2 मध्ये नगरसूलच्या मुलांसोबत जागा मिळाली. लगेचच 11 वाजता हजेरी लावली. बिरंगळ सरांनी माळी बोर्डींगला भोजनासाठी चिठ्ठी दिली.कॉलेजचा पहिला दिवस पुस्तके,जर्नल इ.घेण्यात खूपच व्यग्र राहिला. संध्याकाळी सातला साधारण एक मैल अंतरावरील माळी बोर्डींगला भोजनासाठी पायी जाऊन आलो. कॉलेजचे वर्ग सुरू झाले.सकाळी थेअरीचे क्लॉस आणि दुपारी प्रॅक्टीकल असायचे. कॉलेजातून जर्नल,पुस्तके मिळाली.बॉयलॉजीचे मोठमोठे स्पेलींग, पाठ करणे जरा कंटाळवाणे कामहोते. पण इतर विषयात प्रगति होती. होस्टेलला नगरसूलच्या मुलांबरोबर परिचय वाढला. तसेच भास्कर होन, नितीन कोल्हे, दिलीप कोल्हे, पोपट नरोडे,रविंद्र नरोडे,मच्छींद्र थोरात,बाळू देवकर,गोंदकर, भोकरे,दिनकर आढाव,दिलीप लोणारी,ससाणे,घोटेकर, ढगे, घुगे आदी मित्रांबरोबर,जवळीक वाढली. रविवारी सुट्टीला माझे काका श्री.राहाणेपाटील यांचेकडे कोल्हेवस्ती येसगावला जायचो. त्यामुळे मा.आ.कोल्हेयांचे कुटूंबियांसोबत कायमचा स्नेह निर्माण झाला.पी.डी. सायन्सचे वर्ष चांगल्या मार्कानीं पास झालो. उन्हाळ्याच्या सुटीत कॉलेजतर्फे राहता येथे दुष्काळी विद्यार्थ्यासाठीच्या कॅम्पमध्येभाग घेतला. मला सहजीवनाचा नवा अनुभव आणि आनंद मिळाला. दुसरे वर्षी नवीन होस्टेलवर अभ्यासाची चांगली सोय होती. अत्यंत कर्तव्यदक्ष प्राध्यापकवर्गामुळे प्रीप्रोफेशनल परीक्षा चांगले मार्काने पास झालो.कॉलेजच्या सहकार्यामुळे इंजिनिअरींग कॉलेज पुणे येथे इंजिनिअरींगच्या कोर्सला निवड झाली. पन्नास वर्षांनी मागे वळून बघितल्यावर,आज कॉलेज व्यवस्थापनाने पहिल्या दिवसापासून ग्रामीणभागातील हुशार विद्यार्थ्यांची काळजी घेतल्यामूळे माझ्यासारखा ग्रामीण विद्यार्थी इंजिनिअर होऊ शकला.त्यासाठी कॉलेजचे शतशः आभार मानतोआणि कृतज्ञता व्यक्त करतो.

# भारतीय वंशाचे ऋषी सुनक बनले इंग्लंडचे पंतप्रधान



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**ज्या गोऱ्या साहेबांनी भारतावर दीडशे वर्ष राज्य केले त्याच गोऱ्या साहेबांच्या देशात म्हणजे इंग्लंडमध्ये भारतीय वंशाचा व्यक्ती पंतप्रधान बनला आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात हा योग जुळून आला आहे हे विशेष! इंग्लंडचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी राजीनामा दिल्यानंतर झालेल्या पक्षांतर्गत निवडणुकीतच भारतीय वंशाचे ऋषी सूनक हे पंतप्रधान बनतील अशी शक्यता वर्तविण्यात आली होती. सुरवातीच्या फेरीत ऋषी सूनक यांनी मोठी आघाडी घेतली होती मात्र शेवटच्या फेरीत ते पिछाडीवर पडल्याने लिस ट्रस यांची इंग्लंडच्या पंतप्रधानपदी निवड झाली. मात्र अवघ्या ४५ दिवसांत त्यांना राजीनामा द्यावा लागला. इंग्लंडच्या इतिहासात लिस ट्रस सर्वात कमी काळ पंतप्रधान राहिल्या.**

लिस ट्रस यांनी सत्तेची सूत्रे हाती घेतल्यानंतर मोठमोठ्या बाता मारून लोकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांच्या चुकीच्या आर्थिक नियोजनामुळे इंग्लंडच्या बाजाराला धक्के बसले. ब्रिटनचा पौंड गडगडला. प्रचंड महागाई व आर्थिक संकटात इंग्लंड आचके देऊ लागला त्यामुळे जनतेची त्यांच्याविषयी प्रचंड नाराजी निर्माण झाली. इंग्लंडची धोक्यात आलेली अर्थव्यवस्था सावरू शकत नाही हे लक्षात येताच लिस ट्रस यांनी राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यानंतर ऋषी सूनक हे इंग्लंडचे नवे पंतप्रधान होतील हे निश्चित झाले. सोमवारी हुजूर पक्षाच्या संसदीय दलाने ऋषी सूनक यांची नेता म्हणून निवड केली. सूनक यांना २०० खासदारांचा पाठिंबा मिळाला तर प्रतिस्पर्धी पेनी मोरडोन्ट यांना केवळ २६ खासदारांचा पाठिंबा मिळाल्याने ऋषी सूनक हे इंग्लंडचे नवे पंतप्रधान होतील हे स्पष्ट झाले. २८ ऑक्टोबर रोजी ऋषी सूनक हे पंतप्रधानपदाची शपथ घेतील तर २९ ऑक्टोबर रोजी आपल्या नव्या मंत्रिमंडळाची घोषणा करतील. आयटीव्हीचे राजकीय संपादक रॉबर्ट पेस्टन यांनी हा क्षण ब्रिटिश इतिहासातील अत्यंत महत्वाचा क्षण



असल्याचे म्हटले आहे. ते म्हणतात हुजूर पक्षाचे खासदार ब्रिटिश भारतीयाची त्यांचा नेता आणि देशाचा पंतप्रधान म्हणून निवड करतात हा ब्रिटिश इतिहासातील ऐतिहासिक असा क्षण आहे. २८ ऑक्टोबरला जेंव्हा ऋषी सूनक इंग्लंड चे पंतप्रधान म्हणून शपथ घेतील तेंव्हा इंग्लंडमध्येच नव्हे तर भारतामध्येही फटाके फुटतील कारण ते इंग्लंडमधील भारतीय वंशाचे पहिले पंतप्रधान बनतील. भारत देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असताना मूळ भारतीय असलेल्या व्यक्तीला गोऱ्या साहेबांवर राज्य करण्याची संधी मिळेल. भारतीयांसाठी देखील ही अभिमानाची बाब असेल. इंग्लंडमध्ये जन्मलेले ऋषी सूनक हे दुसऱ्यांदा खासदार म्हणून निवडून आले आहेत. ते सुरवातीला ज्युनिअर मंत्री होते. २०१८ मध्ये त्यांची इंग्लंडच्या निवास मंत्री म्हणून निवड झाली. एक कर्तबगार मंत्री म्हणून त्यांची गणना होते. आपल्या कर्तृत्वाची मोहर त्यांनी मंत्रीपदावर उमटवल्यामुळे त्यांची इंग्लंडच्या अर्थमंत्रीपदी नेमणूक करण्यात आली. इंग्लंडमध्ये अर्थमंत्री हे पंतप्रधान खालोखाल महत्वाचे मानले जाणारे पद आहे. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द उत्कृष्ट अशीच राहिली. ऋषी सूनक यांचे आई वडील त्यांच्या आजी आजोबांसोबत इंग्लंडला गेले व तेथेच स्थायिक झाले. ऋषी सूनक यांचे वडील इंग्लंडमधील प्रसिद्ध डॉक्टर होते तर आई फार्मसीचा व्यवसाय चालवायच्या. त्यांच्या पत्नी अक्षता इम्फोसिसचे नारायण मूर्ती यांच्या कन्या आहेत. १९८० साली हॅम्पशायर येथील साऊथ हंप्टन येथे त्यांचा जन्म झाला. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी तत्वज्ञान, राजकारण आणि अर्थशास्त्र या विषयात पदवी मिळवली. काही काळ व्यवसाय केल्यावर ते राजकारणात उतरले आणि पहिल्याच प्रयत्नात ते खासदार बनले आणि आता इंग्लंडचे पंतप्रधान. अवघ्या ४२ व्या वर्षी इंग्लंडचे पंतप्रधान होणारे ऋषी सूनक हे गेल्या २०० वर्षातील इंग्लंडचे सर्वात तरुण पंतप्रधान आहेत. ऋषी सूनक हे अर्थशास्त्राचे विद्यार्थी असून त्यांनी अर्थमंत्री असताना उत्कृष्ट कार्य केल्यामुळे ते इंग्लंडची बिघडलेली अर्थव्यवस्था सुधारतील असा विश्वास इंग्लंडमधील जनतेला आहे. ज्या गोऱ्या साहेबांनी आपल्यावर दीडशे वर्ष राज्य केले त्याच गोऱ्या साहेबांवर आता ते राज्य करणार आहेत याचा भारतीय नागरिकांना अभिमान आहे. ऋषी सूनक यांचे अभिनंदन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739










# गोदामात ठेवलेले स्वच्छतेचे सामान खाक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील चेलीपुरा भागातील एका गोदामाला लागलेल्या आगीत झाडू, खराटे, फिनेल आदी स्वच्छतेच्या वस्तूंसह इतर साहित्य जळून खाक झाले. आग लागल्याची घटना मंगळवारी पहाटे ३.४५ च्या सुमारास घडली. तब्बल चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग विझवण्यात यश आले असून या घटनेत सुमारे एक कोटींचे साहित्य जळून खाक झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. गोदामातील आगीची झळ लागून लगतच्या चार ते पाच घरांमधील साहित्य निकामी झाले असून भिंतीनाही तडे गेल्याची माहिती अग्निशमन विभागाकडून देण्यात आली.






# सिनेबस्टर मॅगझिनचे मालक रॉनी रॉड्रिग्स यांच्याकडून दिवाळी मिलनचा भव्य सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सिनेबस्टर मॅगझिनचे मालक रॉनी रॉड्रिग्स यांनी दिवाळी मिलनचा भव्य सोहळा आयोजीत केला होता. यावेळी दिलीप सेन, आरती नागपाल, नायरा बॅनर्जी, पंकज बेरी, अरुण बक्षी, सुजय मुखर्जी, लीना कपूर आणि ज्योती सक्सेना यांच्यासह अनेक सेलिब्रिटी पाहुणे उपस्थित होते, मीडिया कर्मचाऱ्यांना अनोख्या भेटवस्तू देखील देण्यात आल्या.

दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर, सिनेबस्टर मासिकाचे मालक रॉनी रॉड्रिग्स यांनी त्यांच्या मुंबईतील कार्यालयात एका भव्य दिवाळी भेट समारंभाचे आयोजन केले होते ज्यात अनेक सेलिब्रिटी देखील उपस्थित होते. या सोहळ्याच्या निमित्ताने अनेक पाहुणे आणि प्रसारमाध्यमांनी या सोहळ्यात आनंदाचे दीप प्रज्वलित केले. या दिवाळी सभेला सेलिब्रिटी पाहुणे

दिलीप सेन, आरती नागपाल, नायरा बॅनर्जी, पंकज बेरी, अरुण बक्षी, सुजय मुखर्जी, लीना कपूर आणि ज्योती सक्सेना उपस्थित होते. सर्वांनी रॉनी रॉड्रिग्जला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आणि रॉनी रॉड्रिग्सने आलेल्या सर्व पाहुण्यांना खास भेटवस्तू दिल्या. या खास प्रसंगी अभिनेत्री आरती नागपाल



म्हणाली की, रॉनी जीने खूप छान काम केले आहे. तो प्रत्येकाला एका डोळ्याने पाहतो, मग तो त्याचा कर्मचारी असो किंवा मीडिया किंवा त्याचे पाहुणे असो. त्याची आवड आणि औदार्य त्याला एक वेगळे आणि मोठे व्यक्तिमत्व बनवते. मी त्याला आणि त्याच्या सर्व चाहत्यांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा देतो. कलर्स टीव्हीच्या फँटसी फिक्शन ड्रामा शो पिशाचिनीमध्ये मुख्य भूमिका साकारणारी नायरा बॅनर्जीही दिवाळीच्या कार्यक्रमात सहभागी झाली होती. पांढऱ्या आणि गुलाबी शिफॉन साडीत ती अप्रतिम दिसत होती आणि म्हणाली, अशा कार्यक्रमाला उपस्थित राहणे हा एक सन्मान आहे जिथे घरकाम, सुरक्षा कर्मचारी आणि संपूर्ण संकुलातील कामगारांना भेटवस्तूंच्या वितरणात प्राधान्य दिले जाते. तिला मानधनही देण्यात आले. माझ्यासाठी हा एक शिकण्याचा अनुभव होता आणि मी रॉनी रॉड्रिग्ज यांच्या विधानाची प्रशंसा करतो. माझ्यासाठी हे लोक सेलिब्रिटी आहेत. माझ्या मते ते सर्वांसाठी समान आहेत आणि प्राधान्य देण्यास पात्र आहेत. त्यांनाही हा प्रकाशोत्सव अधिक उत्साहात साजरा करण्याचा पूर्ण अधिकार आहे. मला या कार्यक्रमाचा भाग बनवल्याबद्दल मी रॉनीजींचे आभार मानतो आणि प्रत्येकाला 'पिशाचिनी' ही मालिका नियमितपणे पाहण्याची विनंती करतो.

मिस्टर रॉनी रॉड्रिग्स यांनी त्यांच्या सिने बस्टर टीमसह, गेल्या काही वर्षांप्रमाणेच सर्व स्तरातील लोकांसोबत दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी केली. हाऊसकीपिंग कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी आणि क्षुल्लक कामात गुंतलेल्यांना दिवाळी भेटवस्तू आणि सन्मान देण्यात आले जेणेकरून ते हा सर्वात मोठा सण आदराने आणि उत्साहाने साजरा करू शकतील, विशेषतः त्यांच्या मुलांसह आणि कुटुंबासह. आम्ही तुम्हाला सांगतो की रॉनी रॉड्रिग्स नेहमीच धर्मादाय कार्यात व्यस्त असतात आणि ते काही अनाथ शाळांमधील मुलांची काळजी घेत आहेत. त्यांच्या दिवाळी सोहळ्याला मोठ्या संख्येने पत्रकार आणि छायाचित्रकार उपस्थित होते आणि त्यांनी सर्व मीडिया कर्मचाऱ्यांना रोमांचक मीडिया किट दिले. दिग्गज अभिनेते जॉय मुखर्जी यांचा मुलगा सुजॉय मुखर्जी, निर्माता आणि दिग्दर्शक नीलेश मल्होत्रा यांचाही रॉनी रॉड्रिग्ज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अभिनेता पंकज बेरी यांनी येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना रॉनी जी यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनी हा दिवाळी भेट सोहळा अविस्मरणीय कार्यक्रम बनवला. त्यांनी सर्व पाहुणे आणि त्यांचे सर्व कर्मचारी तसेच माध्यमांना उत्कृष्ट आणि संस्मरणीय भेटवस्तू दिल्या.

संगीतकार दिलीप सेन यांनीही रॉनी जीचे कौतुक केले आणि सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

अभिनेत्री लीना कपूरने येथे सांगितले की, रॉनीजींनी आयोजित केलेला हा दिवाळी मिलन सोहळा मला खूप आवडला. येथे आरती नागपाल, पंकज बेरी आणि अरुण बक्षी यांना भेटून आनंद झाला. मी सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा देतो. सुजय मुखर्जी यांनी देखील रॉनीच्या महानतेची कबुली दिली आणि त्यांचे कौतुक केले. अशा दिवाळी मिलन उत्सव आपल्या सर्वांमध्ये सकारात्मकता निर्माण करतात. सिनेबस्टर मॅगझिनचे मालक रॉनी रॉड्रिग्स यांनी समारंभासाठी आलेल्या सर्व पाहुण्यांसह मीडियाच्या लोकांना एक खास भेट दिली आणि त्यांच्या औदार्याचे सर्वांनी कौतुक केले.

## आरेतील 'तो' बिबट्या लवकरच जेरबंद होणार

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : गोरेगावमधील आरे दुग्ध वसाहतीतील युनिट क्रमांक १५ येथे बिबट्या हल्ल्यात दीड वर्षांच्या बालिकेचा मृत्यू झाल्यानंतर हल्ला करणाऱ्या बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी जोर धरू लागली असून वनविभागाने या बिबट्याला जेरबंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार युनिट १५ च्या परिसरात दोन पिंजरे लावण्यात येणार असून यासंबंधी लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे. त्याच वेळी बिबट्याच्या हालचाली टीपण्यासाठी या परिसरात २२ सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्याचाही निर्णय घेण्यात आला असून यापैकी १२ कॅमेरे बसविण्यात आले आहेत.











# बलिप्रतिपदा...पाडवा

आधुनिक केसरी

**कार्तिक शुद्ध प्रतिपदा म्हणजे पाडवा दिवाळीचा पाडवा . म्हणजे वर्षातील साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त पाडव्याला मारवाडी व्यापारी आपल्या संसाराचा वर्षाचा आरंभ करतात. दिवाळीच्या इतर दिवसाप्रमाणे पहाटे उठून अभ्यंग स्नान केले जाते. घरातील देवतांची पूजा अर्चना झाल्यावर ग्रामदेवतेचे आपल्या कुलदैवतेचे मंदिरात जाऊन दर्शन घेण्याची प्रथा आपल्याकडे प्रचलित आहे. इष्टमित्रांच्या घरी अगर ज्यांना निमंत्रित करून दिवाळीच्या फराळाचा आनंद आस्वाद घेता घेतला जातो.**



पाडवा बली प्रतिपदा या दिवसाविषयी आख्यायिका ही सर्वत्र प्रचलित आहे ती अशी विष्णूच्या दहा अवतारापैकी पाचवा अवतार वामन अवतार असे मानले जाते .वामनाने बटूचा वेश परिधान केला आणि दैत्याचा राजा बळी याच्याकडे भिक्षा मागितली ती म्हणजे तीन पावलं जमीन दे. दोन पावलं टाकल्यानंतर तिसरे पाऊल कोठे ठेवू असे म्हटल्यावर बळीराजांनी आपल्या मसकावर तिसरे पाऊल ठेवावे असे म्हटल्यावर.. बटूवामनाने बळीराजाच्या डोक्यावर आपले तिसरे पाऊल ठेव त्याला पातळ लोटून दिले. बळीराजा भक्त प्रल्हादाचा मुलगा होता.. तसा तो मोठा दानशूर व उदार अंतःकरणाचा म्हणून प्रसिद्ध होता. बळीराजाच्या राज्यात सोबत्ता होती.. समृद्धी होती.. भरपूर संपत्ती राज्यात होती.. पैसाही होता.. त्यामुळे समाजात काम करण्याची वृत्ती लोक पावलेली होती. लोक भोगविलासी चैनी झालेले होते. त्यामुळे सारी समाजव्यवस्था रास होत चाललेली होती. हे सार साम्राज्य जाईल की काय अशी भीती निर्माण झालेली होती. बळीराजा असेपर्यंत हे सारे करणे अशक्य होते. त्यामुळेच विष्णूनी बटूवामनाचा अवतार घेतला. तो आदिती व कश्यप यांच्या मुलाच्या रूपाने बळीराजा यज्ञ करीत असलेल्या ठिकाणी आला नी त्यांनी भिक्षा मागितली. त्याने तीन पावले जमीन मागितली.... ब्राह्मणाकडे पूर्वीप्रमाणे शिक्षणाचे काम द्यावे.. राज्य कारभार क्षत्रियाकडे द्यावा.. व्यापार ईश्वरावर श्रद्धा असणाऱ्या वैशाखडे सोपंवावा.. बळीने या वामनाच्या सर्व मागण्याची परिपुर्तता केली .सरचेशेवटी बळीराजाची समर्पणाची आठवण सर्वांना सदैव राहावी यासाठी त्यांनी वर मागून घेतला. त्याचप्रमाणे आजचा दिवस हा पृथ्वी तलावावरील लोक तुझ्या नावाचा नावाने साजरा करतील अशा आशीर्वादही त्याच दिला. त्याचे स्मरण म्हणून आपण दिवाळीची ही बलिप्रतिपदा आनंदाने सादरी करतो. मात्र या दिवशी पूर्वी बळीराजा व त्याची पत्नी हे दोघे मिळून विद्यांवलीची पूजा करीत असत. ...

देवाचा शत्रू असूनही इंद्रा कडून बळीराजास खूप मोठा मान मिळाला. म्हणूनच या दिवशी बळीच्या मूर्तीची पूजा केली जाते. बलिप्रतिपदेला दान केल्याने धन वाढते व विष्णु देवता त्यास प्रसन्न होते ही समजूत आजही रूढ आहे. त्यामुळे लोक या दिवशी गोरगरिबांना खूप मोठ्या प्रमाणावर दान धर्म करताना दिसतात. तसेच पाडव्याच्या दिवशी प्रातःकालीच सरस्वती देवतेचे पूजन करण्याचा प्रघात आपणाकडे आहे. त्याप्रमाणे घराघरातून व व्यापारी वर्गातूनही वही पूजन चोपडी पूजन करून अनेक धार्मिक कार्यक्रम करण्याची परंपरा आपणाकडे आहे. पाडवा हा विक्रम संसारातील पहिला दिवस .आपल्या दिवाळीतील हा अत्यंत महत्त्वाचा दिवस .स्त्री वर्गाच्या दृष्टीने दीपावलीत हा महत्त्वाचा दिवस. या दिवशी स्त्रिया आपल्या पतीला ओवाळतात पतीही आपल्या पत्नी सुरेख अशा भेटवस्तू देतात. नवनवीन दाग दागिने वस्त्रालंकार पत्नीला भेट देण्याची परंपरा आजही कायम आहे. पंचपक्वानाच्या जेवणाचा आस्वाद घेतला जातो. त्यामुळे प्रत्येक जण उत्साही आनंदी झालेला असतो .पाडव्याच्या दिवशी पार्वतीनेही शंकराला द्युतात हरविलेले होते. त्यामुळे या प्रतिपदेला द्युत प्रतिपदा असे देखील संबोधले जाते. पूर्वी या दिवशी श्रीकृष्णासाठी लोक गोवर्धनाची पूजा करीत असत. अंगणात अगर आपल्या शेतात शेणाचा पर्वत करून डोंगर तयार करून त्यावर गाय ,बैल , गोपाल कृष्ण, इंद्र , इतर देवदेवतांच्या प्रतिमा ठेवून त्यांची पूजा करीत असत रूढी परंपरा आहे.परंपरा विविध असल्या तरी दिवाळीचा पाडवा हा वर्षातील एक शुभ मुहूर्त ..सर्वांसाठीच मोठ्या उत्साहाचा आनंदाचा आहे हेच खरं...



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

# भाऊबीज

आधुनिक केसरी

**मानवी जीवनात नाती प्रेमाच्या रेशीम धाग्याने बांधलेली असतात. भारतीय संस्कृतीत अशा नात्यांची जपणूक विलक्षण नाजूकतेने केलेली आहे. भावा बहिणीच्या रेशीम बंधनाच्या अतूट नात्याचे प्रतीक म्हणजे भाऊबीज. प्राचीन काळात हे भावा बहिणीचे नाजूक नाते अतूट नव्हते त्या काळात भावाबहिणींचे विवाह होत असत.**

यतीचा जुळा भाऊ यम या दोघांची बहीण यमी किंवा यमुना.. यमहा बलवान अतिशय देखणा व धृष्टपुष्ट होता. यमुना वयात आली आपल्या देखण्या सुंदर भावावरच मोहित झाली. ती त्याच्या प्रेमात स्वतःला विसरून गेली. तिने आम्हास माझ्याशी तू विवाह कर म्हणून मागणी घातली. पण यमहा अत्यंत मायाळू ..प्रेमळ ..जिव्हाळा हृदया ठेवणारा होता. त्याने आपल्या बहिणीस यमुनेस समजावून सांगितले की आपण दोघे एकाच नात्याचे आहोत. त्यामुळे मी तुझा पती होऊ शकत नाही. तरी तू तुझ्या मनातील लालसा सोडून दे. तू विषम नात्याच्या पुरुषाशी विवाह कर. त्याचे विचार यमुनेच्या मनावर खूप परिणामकारक ठरले. तिने त्या दिवसापासून भावाबहिणीचे अत्यंत पवित्र असे नाते सर्वांना सांगितले. असे बंधू भगिनीचे नाते निर्माण झाल्यावर यम प्रथमच आपल्या प्रेमळ बहिणीकडे गेला. तो दिवस म्हणजे कार्तिक शुद्ध द्वितीयेचा दिवस. यम राजाचे बहिणीने अत्यंत आदराने प्रेमाने जिव्हाळ्याने त्याचे स्वागत केले. मनापासून त्याचे आदरातील केले. आपल्या घरी प्रथमच आलेल्या भावाला सुगंधी तेल.. उठणे लावून.. मंगल स्नान घातले. त्याला मिठाई.. गोड फळे फराळासाठी दिली. दुपारी पंचपक्वान्नाचे जीवन जेवण दिले. त्या दिवशीपासून भाऊबीज हा सणात अस्तित्वात आला असे मानले जाते.

सख्या बहिणीपेक्षा कित्येक वेळा मानलेल्या बहिणीची माया देखील अधिक असते प्रेम अधिक असते. सुभद्राही श्रीकृष्णाची सख्खी बहिण तरीपण मानलेल्या द्रोपदी या बहिणीवर त्याचे अधिक प्रेम होते. नारदानी त्या दोघींचीही परीक्षा घेण्याचे ठरवले. श्रीकृष्णाचे बोट कापल्याचे सांगितल्यावर सुभद्रेस्त त्याचे बोट बांधण्यास देण्यास सिंधी मिळाली नाही .तर द्रौपदीला त्यांनी हे गोष्ट सांगितल्यावर द्रौपदीने अंगावरील भरजरीत शालू क्षणाचा विलंब न करता फाडून दिला.. कितीही बहिणीची माया ..अपार प्रेम.. अशाच प्राचीन घटनेचा आधुनिक आविष्कार म्हणजे आजची भाऊबीज म्हणावी लागेल.

प्रतिवर्षी यम हा भाऊबीजेला बहिणीकडे जात असल्यामुळे त्या दिवशी मरण येणाऱ्या व्यक्तीचे आत्मे हे स्वर्गात जातात अशी एक रुढ समजूत आहे. अशा कथेमुळे कार्तिक शुद्ध द्वितीयेला यमद्वितीय असे नाव पडलेले आहे. असे असले तरी या सणा



मागील विचार असाच आहे. विवाह नंतर मुलगी सासरी जाते. तिने आपल्या भावास विसरू नये. भावा बहिणीतील माया प्रेम कायम राहावे .तसेच भावानेही बहिणीस विसरू नये किमान वर्षातनं एकदा तरी या भाऊबीजेच्या सणाच्या माध्यमातून बहिणीकडे जावे. भोजन करावे बहिणीने भावाला ओवाळावे आणि आपल्या एकतीप्रमाणे भावाने बहिणीस भेट द्यावी. भाऊबीज हा भावा बहिणीच्या भाव भावनांच्या रेशमी धाग्याने बांधलेला. .गुंफण केलेला भाऊबीज हा अनमोल असा सण आहे.

उत्सवाचा राजा म्हणजे दीपोत्सव.. आबाल वृद्धांना गोरगरिबांपासून श्रीमंतानाही मनापासून आवडणारा हा सण.. मानवी मनास विलक्षण आवडणारा सण.. दीपावली सुखद क्षणांची आनंदाची समाधानाची मोठी शिदोरी देणारा.. दीपोत्सव आपल्या दैनंदिन जीवनातही प्रत्येक जण दिवाळीचा हा सण विलक्षण आनंदाने उत्साहाने साजरा करताना दिसतात.. एका वेगळ्याच आशेने जीवन फुलवीत असणारा हा सण.. त्यावेळी ओढ असते ती पुढील वर्षात येऊ पाहणाऱ्या त्या विलक्षण सुख समाधान आणि आनंद देणाऱ्या या दीपोत्सवाची ...म्हणूनच या दीपोत्सवाचीच सारे जण वर्षभर आतुरतेने वाट पाहत असतात हे बाकी खरं....

# दिवाळी सुरू झाली तरी आनंदाचा शिधा मिळेना : प्रा. जीवन कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरात वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने १०० रुपयांत आनंदाचा शिधा वितरित करण्याचा निर्णय घेतला. मात्र दिवाळी सण सुरू झाला तरी सोयगाव तालुक्यातील सावळदबारा, देव्हारी, नादागांव, नादांतांडा, मोलखेडा, घाणेकर तांडा, देव्हारी, टिटवी, सोयगावसह काही गावातील राशन दुकानात आनंदाचा शिधा उपलब्ध न झाल्याने राशन कार्ड धारकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. वाढती महागाई लक्षात घेऊन जनसामान्यांना दिवाळी साजरा करता यावी यासाठी दिवाळी फराळाचे साहित्य रास्त भाव दुकानांमधून देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. साखर, रवा, चणाडाळ आणि पामतेल असा शिधा या योजनेतून फक्त शंभर रुपयात उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यामुळे या उपक्रमाला आनंदाचा शिधा असे नाव देण्यात आले आहे. मोठा गाजावाजा करून राज्य सरकारने या योजनेची घोषणा केली होती. मात्र दिवाळी सुरू झाली तरी आनंदाचा शिधा सर्वसामान्यांच्या घरात पोहोचू शकलेला नाही. त्यामुळे जनसामान्यांना शिधा मिळणार कधी आणि त्यांचा फराळ होणार कधी असा प्रश्न पडला आहे. नवजीवन प्रोव्हिजन किराणा दुकान सावळदबारा येथे एक किलो चणाडाळ ६० ते ८० रुपयाला मिळते आहे. रव्यासाठी एक किलोला ३६ ते ५० रुपये मोजावे लागत आहेत. तर साखर ४० ते ४४ रुपये, पामतेल शंभर रुपये किलोने मिळत आहे. हा शिधा सुमारे तीनशे रुपयाचा हा शिधा पुरवठा विभागाकडून शंभर रुपयांत मिळणार आहे. त्यामुळे सर्वानाच या शिध्याची आस होती. दिवाळी सुरु झाली तरी सोयगाव तालुक्यात औरंगाबाद विभागातून साखर आलीच नाही म्हणून सावळदबारा परिसरात शिधापत्रिका धारकांना वाटप करता आली नाही असे रेशन दुकान दाराचे म्हणणे आहे. तालुक्यातील बहुतांश गावात शिधा साखर नसल्याने रास्त भाव दुकानांवर अद्याप पोहचू शकलेला नाही. अशी माहिती प्रा जीवन कोलते सामाजिक कार्यकर्ते यांनी बोलताना सांगितले.






# बजेट मामांच्या संकल्पनेून उजळली स्मशानभूमी

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** स्मशानभूमीत नकारात्मक ऊर्जा असते असे शास्त्र सांगते. मात्र मुखेड, ता. येवला येथील भाऊसाहेब चव्हाण उर्फ बजेट मामा या अवलीयाच्या संकल्पनेतुन लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने चक्क शेकडो दिव्यांनी स्मशानभूमी उजळून निघाली. परिसरात या अनोख्या पद्धतीने साजऱ्या केलेल्या दिपावलीची चर्चा आहे.

मुखेड येथील भाऊसाहेब चव्हाण उर्फ बजेट मामा हे पदरमोड करून गेल्या तीन चार वर्षांपासून स्मशानभूमीची साफसफाई करतात. तेथील वृक्षवल्लींचे संगोपन करतात. दोन वर्षांपूर्वी स्मशानभूमी विषयी ग्रामजनांच्या मनातील अंधश्रद्धा कमी व्हावी या परिसरात नकारात्मक ऊर्जा जाऊन सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हावी यासाठी त्यांनी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पदरमोड करून दिवे लावले. मात्र यावर्षी त्यांनी लोकसहभागाच्या दृष्टीने गावात फलक लावून प्रत्येक घरातून पाच पणत्या आणण्याचे आवाहन केले. त्यांच्या अवाहनास ग्रामस्थांनी प्रचंड प्रतिसाद दिला. ग्रामस्थांनी शेकडो पणत्या व गोडेतेल जमा केले. या शेकडो पणत्यांच्या माध्यमातून स्मशानभूमी उजळून निघाली. स्मशानभूमीत मोठ्या प्रमाणावर फुलांच्या सहाय्याने आरास करण्यात आली. स्मशानभूमीच्या दरवाजावर, आजूबाजूला फुलांच्या माळा व तोरण बांधण्यात आले. स्मशानभूमी परीसरात रंगोळी काढण्यात आली. फटाके वाजविण्यात आले. विशेष म्हणजे भजनी मंडळाने प्रतिसाद देत रात्री भजनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला. यासाठी जि.प.सदस्य छगन आहेर, अनंत आहेर, अरुण आहेर, बाबासाहेब गुंड सोमनाथ पानसरे आदींचे सहकार्य लाभले.

बजेट मामा हे आठवडे बाजारात भाजीपाला विकून गुजराण करणारे सर्वसामान्य गृहस्थ. मात्र पदरमोड करून काहीतरी वेगळे करण्याची त्यांची धडपड वाखाणण्याजोगीच. त्यांच्या संकल्पनेतून कार्तिक पौर्णिमेला दीनानाथ मंदिरात दिव्यांची आरास केली जाते. जेवणाची पंगत दिली जाते. त्यामुळे त्यांचा मुखेड ग्रामपंचायतने विशेष पुरस्कार देऊन सन्मान केला आहे.








## धुळ्यात वृक्ष लागवडीत लाखोंचा भ्रष्टाचार

### पालिका आयुक्तांसहित कॉन्ट्रॅक्टरचा हात असल्याचा संशय



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा हा कुठल्या ना कुठल्या भ्रष्टाचाराच्या विषयात अडकलेला असतो असाच एक प्रकार काही वर्षांपूर्वी घडला आहे परंतु हा प्रकार कोणाच्याही लक्षात येणार नाही अशा प्रकराचा आहे.

शहरात अनेक कॉलनी परिसरात खेळण्यासाठी प्रत्येक वार्डात दोन ते तीन  मोकळे मैदान असे एकूण सम्पूर्ण शहरात 20 ते 25 ओपन प्लेस होते कालांतराने त्यात संपूर्ण धुळे शहरात त्या ओपन प्लेस मध्ये पाय ठेवण्यासाठी जागा नसेल एवढी झाडे लावण्यात आली. ह्या ओपन प्लेस मध्ये काम चालू असतांना कित्तेक ठिकाणी जाब विचारण्यात आला परंतु ठेकेदार यांनी स्थानिक नागरिकांना सांगण्यात आले कि आम्ही मोठे गार्डन तयार करत आहोत...! असे  स्थानिक नागरिकांना खोटे आश्वासन देऊन त्याच ओपन प्लेस महानगर पालिके ने त्याब्यात घेऊन त्यात साधारण एकाच प्रजातीचे अनेक वृक्ष लागवडी साठी लाखोचा निधी खर्च करण्यात आला. व प्रत्येक ओपन प्लेस कंपाउंड करून लाखो रुपये खर्च करून लाकडी झोपड्या तयार करण्यात आल्यात झोपड्या कोणासाठी...? परंतु  हे कोणाच्या लक्षात आले नाही. त्या वृक्ष लागवडी नंतर टेंडरची बिले निघेपर्यंत त्याची निगा राखली गेली त्यानंतर झाडांची अवस्था खूप बिकट झाली आहे काही झाडे तोडण्यात आली व काही लाकडी झोपड्या उध्वस्त करण्यात आले अशा या गोष्टींसाठी लाखोचा निधी खर्च का केला जातो यात फक्त कॉन्ट्रॅक्टर व पालिका अधिकारी यांचे खिसे भरण्यासाठी धुळेकर जनतेच्या पैशाची उधळण करण्यात येते का असा प्रश्न प्रत्येक नागरिकाच्या मनात उपस्थित होत आहे . याची सखोल चौकशी व्हावी व संबंधित पालिका अधिकारी व कॉन्ट्रॅक्टर यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी लोकशाही मराठी पत्रकार संघातर्फे करण्यात येणार आहे.

# प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबरांनी मानवतावादी मार्ग दाखवला

## हजरत मौलाना इरफान कासमी जमीयतूल उलमाए हिंदच्या वतीने औरंगाबाद येथून सुरुवात



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांनी जगाला मानवतावादी, समान न्याय, शांती व सदभावनेचा मार्ग दाखवला. समाजाने त्यांनी दाखवलेल्या मार्गावर जीवन व्यतीत केले तर वाईट प्रवृत्ती, वाईट सवईपासून दुर राहुन एका ईश्वराची भक्ती केल्यास यश नक्की मिळेल. समाजात वाढणारा नशा, गुन्हेगारी, लग्नात अतोनात खर्च यावर प्रतिबंध लावण्यासाठी समाजाने पुढे यावे, वेळोवेळी सन्मार्ग दाखवण्यासाठी इश्वराने प्रेषीत पाठवून मार्ग दाखवला, जो वाईट मार्गाने जाईल त्याचे काय परिणाम होतात याबाबत मार्गदर्शन देवबंद दारुल उलूमचे हजरत मौलाना इरफान कासमी यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले. किराडपुरा येथे शनिवारी सायंकाळी जमीयतूल हिंदच्या वतीने समाजात सुधारणा आणण्यासाठी भव्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जमीयतूल उलमाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष हाफिज नदीम सिद्दीकी उपस्थित होते. यावेळी विविध धर्मगुरुंनी बयान करत आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात कारी अन्सार इशाअती यांनी कुरआन पठनाने झाली. कारी मिनहाज व अजीज इमामोद्दीन यांनी नात ए पाक पठन केली. प्रस्तावना मुफ्ती नईम नदवी यांनी केली. मौलाना अब्दुल शकुर जामई, मौलाना मोईजोद्दीन फारुकी, मुफ्ती अब्दुल रज्जाक मिल्ली, मुफ्ती हजरत रेहेमान, हजरत मौलाना अब्दुल कदीर मदनी, हजरत मुफ्ती मोईजोद्दीन कासमी यांनी व्यासपीठावर आपले विचार व्यक्त केले. सुत्रसंचालन मुफ्ती अब्दुल गफ्फार यांनी केले. महाराष्ट्र अध्यक्ष हाफिज नदीम यांनी सांगितले जमीयतूल उलमाए हिंद 1990 पासून देशात काम करत आहे. सिरतून्नबी व समाजातील वेळोवेळी येणारे बिघाड व नशा मुक्तीसाठी दरवर्षी कार्यक्रम घेतले जातात. समाजात वाईट सवईपासून सुटका करण्यासाठी हि चळवळ तीव्र करण्यासाठी 22 ऑक्टोबर पासून औरंगाबाद येथून मोहिम सुरु केली. 1 नोव्हेंबर पर्यंत मराठवाड्यात हे कार्यक्रम घेतले जातील. दुसऱ्या टप्प्यात विदर्भ, तिसऱ्या टप्प्यात पश्चिम महाराष्ट्र व शेवटी मुंबई येथे कार्यक्रम घेतले जातील. समाजाने या कार्यक्रमात सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# दिवाळी पाडव्या निमित्ताने पैठण शहर व्यापारी महासंघाचे बुधवारी स्नेहमिलन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** दिपावली निमित्त पाडव्याच्या दिवशी पैठण शहर व्यापारी महासंघ आयोजित दिपावली स्नेहमिलन कार्यक्रमाला सर्व व्यापारी ,नागरिक यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पैठण शहर व्यापारी महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे.

दि.26 ऑक्टोबर बुधवार रोजी संध्याकाळी 7 वाजता पैठण येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोबतच नागरिकांना छत्रपती संभाजीनगरचे प्रसिध्द असे अतुल दिवे निर्मित स्वरसाक्षी ग्रुप यांच्या सुमधुर आवाजात बहारदार गितांचा कार्यक्रम सुद्धा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाला छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संदीपान भुमरे यांच्यासह विविध पक्षाचे राजकीय पदाधिकारी,अधिकारी ,उद्योजक,



व्यापारी व नागरिक उपस्थित राहणार असुन सर्वांनी दिपावली स्नेहमीलन कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पैठण शहर व्यापारी महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# तुझ्यासाठी काहीही मराठी चित्रपट ऑस्करच्या शर्यतीत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नांदेडच्या भूमिकन्या सौ.



कल्पना संजय गायकवाड यांचा तुझ्यासाठी काहीही.. हा मराठी चित्रपट ऑस्करच्या शर्यतीत गेला आहे. याबद्दल निर्माती सौ. कल्पना संजय गायकवाड, दिग्दर्शक डॉ.संजय माधवराव गायकवाड यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. नांदेडमध्ये दि. 26 जानेवारी 2022 रोजी रोजी प्रेक्षकांच्या अभूतपूर्व प्रतिसादात तुझ्यासाठी काहीही... हा चित्रपट प्रदर्शित झाला.

या चित्रपटाची निर्माती सौ. कल्पना संजय गायकवाड, दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक, कथा,पटकथा आणि मुख्य भूमिका डॉ. संजय माधवराव गायकवाड यांची आहे. डॉ. संजय माधवराव गायकवाड राज्य कामगार विमा योजना सोसायटीचे उपसंचालक आणि उत्कृष्ट कलावंत आहेत. हा चित्रपट अवयवदानावर आधारित असून सामाजिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, बंधुभाव, स्त्रियांचा आदरभाव व भारताच्या राष्ट्रध्वजाचा सन्मान या गोष्टीचा सन्मान करण्यात आला आहे.



हा चित्रपट उत्कृष्ट अभिनेता,उत्कृष्ट संगीत, उत्कृष्ट चित्रपट, उत्कृष्ट पटकथा, आणि उत्कृष्ट गीत या कॅटेगरीतून निवडण्यात आला आहे.

या चित्रपटातील ग्रीष्मात कसा वसंत फुलला, खोटा देव माझा,भारत माता की जय ही गाणी प्रचंड गाजली.

ऑस्करच्या घोडदौडीत आपला करिश्मा दाखविण्यासाठी हा चित्रपट जागतिक पातळीवर गेल्यामुळे मराठी चित्रपट प्रेक्षकांत आनंदाची लहर पाहायला मिळत आहे.

सदरील चित्रपट ऑस्करच्या शर्यतीत धूमाकूळ घालत असल्याने चित्रपट निर्माती सौ.कल्पना संजय गायकवाड आणि डॉ.संजय माधवराव गायकवाड आणि त्यांच्या टीमचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.





काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

राजस्थानी मल्टीस्टेट कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

# राजस्थानी मल्टीस्टेट
## को-ऑप. क्रेडीट सोसा. लि., परळी वैजनाथ

• बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स

CERTIFIED ISO 9001:2015 COMPANY
ISO 9001:2005 मानांकन प्राप्त संस्था



चंदुलाल मो. बियाणी
चेअरमन, राजस्थानी मल्टीस्टेट

मुख्य कार्यालय : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि.बीड मो.९१३००७२१७८/९१३००७२१८८
कॉर्पोरेट ऑफिस : २०५/२०६, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड शाखा, आकाशवाणी, औरंगाबाद, मो.९१३००७२१७६

91 दिवसाच्या मुदत ठेवीवर मिळवा 10% व्याजदर

3 वर्षाच्या मुदत ठेवीवर 12.50% व्याजदर मिळवा

13 महिन्याच्या ठेवीसाठी 1 लाख रूपयाच्या पटीत गुंतवणूक करा व
१०००/- रूपयांच्या पटीमध्ये मासिक व्याज मिळवा

*नियम व अटी लागू

दीपावलीच्या आपण सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

गुंतवणूक एकपट..परतावा दुप्पट...आनंद अनेकपट!
६ वर्षात दाम दुप्पट ठेव योजना

आपल होईल स्वप्न साकार
वाहन तारण कर्ज
२५% डाऊन पेमेंट
तात्काळ उपलब्ध



181 दिवस मुदत ठेवीवर मिळवा 11% व्याजदर

पैशाने पैसा मिळवून देणारे खाते!
करंट अकाऊंट उघडा 6%
६% व्याजदर मिळवा

संकटकाळी अनेकांना, त्यांच्या सोन्याने तारलं!
सोने तारण कर्ज
सोने खरेदी कर्ज
•१२% व्याजदर •२५% (मार्जीन भरुन)
त्वरीत उपलब्ध....
*नियम व अटी लागू

आजच उघडा
स्मार्ट सेव्हिंग खाते
दैनंदिन शिल्लक रक्कमेवर मिळवा ६% व्याज
१ लाख + ॲव्हरेज बॅलेन्स वर ८% व्याजदर मिळेल.

खालील सर्व सुविधा शाखेत चालू आहेत.
- मायक्रो फायनान्स कर्ज
- वैयक्तिक कर्ज
- नेट बँकींग
- बचत गट कर्ज
- मोबाईल एटीएम
- पिग्मी तारण कर्ज
- ऑनलाईन प्रणाली
- गृह कर्ज
- माफक दरात लॉकर
- कॅश क्रेडीट कर्ज
- मुदत ठेव तारण कर्ज
- पगार तारण कर्ज

डेली कलेक्शन सुरू करा
कर्ज घ्या
५० हजार ते १० लाखापर्यंत कर्ज उपलब्ध

सर्व केमिस्ट बांधवांसाठी
विनातारण १ लाख रूपये
केमिस्ट कर्ज योजना

आजच आपली विमा पॉलिसी काढा...

| वार्षिक रु.750/- रु विमा पॉलिसी | वार्षिक रु.310/- रु विमा पॉलिसी | वार्षिक रु.50/- रु विमा पॉलिसी |
|---|---|---|
| वयोमर्यादा : ०५ वर्षापासून ते ६५ वर्षापर्यंत | वयोमर्यादा : ०५ वर्षापासून ते ६५ वर्षापर्यंत | वयोमर्यादा : ०५ वर्षापासून ते ६५ वर्षापर्यंत |
| रू.७५०/-भरा व अनेक फायदे मिळवा | रू.३१०/-भरा व अनेक फायदे मिळवा | रू.५०-भरा व अनेक फायदे मिळवा |

कार्यरत शाखा व विस्तारीत सेवा कक्ष

- मुख्य कार्यालय व शाखा : परळी वै.
- पंचशिल नगर शाखा : परळी वै.
- महेश नगर शाखा : औरंगाबाद
- सिरसाळा शाखा
- सोनपेठ शाखा
- अंबाजोगाई शाखा
- बीड शाखा
- राजाबाजार शाखा : औरंगाबाद
- बजाज नगर शाखा, वाळूज : औरंगाबाद
- गणेशपार विस्तारीत सेवा कक्ष, परळी वै.
- माळीवाडा विस्तारीत सेवा कक्ष : औरंगाबाद
- अंबड शाखा
- जालना शाखा
- गंगाखेड शाखा
- अंबाजोगाई विस्तारीत सेवा कक्ष १
- नेहरू चौक (तळ) विस्तारीत सेवा कक्ष : परळी वै.
- शिवाजी नगर विस्तारीत सेवा कक्ष : परळी वै.
- जालना विस्तारीत सेवा कक्ष
- घाटनांदूर विस्तारीत सेवा कक्ष
- बीड विस्तारीत सेवा कक्ष
- उदगीर विस्तारीत सेवा कक्ष
- दिंद्रुड विस्तारीत सेवा कक्ष
- टोकवाडी विस्तारीत सेवा कक्ष
- नांदेड विस्तारीत सेवा कक्ष
- लातूर विस्तारीत सेवा कक्ष
- औराद शाहा. विस्तारीत सेवा कक्ष
- उमरगा विस्तारीत सेवा कक्ष
- अहमदनगर विस्तारीत सेवा कक्ष

• नियोजित विस्तारीत सेवा कक्ष : केज, माजलगाव, परभणी, धर्माबाद, पंढरपूर, उमरखेड लवकरच आपल्या सेवेत..

अधिक माहितीसाठी Toll Free No : 1800 419 7501 Web : www.rajasthanimultistate.in help@rajasthanimultistate.com